# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २६/०८/२०२२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २६/०८/२०२२ रोजी सभा सुचना क्र. **९** दि. २२/०८/२०२२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी १०.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. राकेश शाह हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्रीम. शानु जोरावर गोहिल | सदस्या |
| ४. | श्रीम. सुनिता रमेश जैन | सदस्या |
| ५. | श्री. सुरेश खंडेलवाल | सदस्य |
| ६. | श्री. आनंद द. मांजरेकर | सदस्य |
| ७. | श्री. मनोज रा. दुबे | सदस्य |
| ८. | श्रीम. सुजाता य. पारधी | सदस्या |
| ९. | श्रीम. सिमा क. शाह | सदस्या |
| १०. | श्री. जयेश भानुदास भोईर | सदस्य |
| ११. | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| **१२.** | श्रीम. शर्मिला बगाजी | सदस्या |
| **१३.** | श्रीम. अर्चना अ. कदम | सदस्या |
| **१४.** | श्रीम. कुसुम सं. गुप्ता | सदस्या |
| **१५.** | श्रीम. मर्लिन म. डिसा | सदस्या |
| १६. | श्री. अशरफ मो. शेख | सदस्य |

**गैरहजर सदस्य - निरंक**

मा. सभापती :-

आजच्या सभेसाठी आलेले सर्व अधिकारी मा. आयुक्त ह्यांचे स्वागत करतो. भारतोच मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब भारताचे गृहमंत्री अमित शहा साहेब, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, मिरा भाईंदरचे माजी आमदार नरेंद्र मेहता, मा. महापौर ज्योत्स्ना हसनाळे मॅडम, मा. उपमहापौर हसमुख गेहलोत साहेब ह्यांचे मी आभार मानत आहे. कारण मला मिरा भाईंदर स्थायी समितीमध्ये सभापती पदी विराजमान होण्याची संधी दिली. सभापती कालावधीमध्ये ह्या शहराचा विकास कसा होईल ह्याकडे लक्ष देऊन आपण विविध विकास कामांना मान्यता दिली. आपण जास्तीत जास्त काम कशी होतील ह्याचा विचार करुन शहरातील विकास कामे होण्यास योगदान दिलेले आहे. ह्याचे सर्व श्रेय स्थायी समितीचे सर्व सदस्य आपले मनपाचे सर्व सदस्य तसेच पदाधिकारी व प्रशासनाला जात आहे. समितीच्या सर्व सन्मा. सदस्यांनी महापालिकेचे मा. आयुक्त साहेब सर्व अधिकारी कर्मचारी ह्यांनी मला माझ्या सभापती कालावधीमध्ये विशेष सहकार्य केले म्हणून मी सर्वांचा आभारी आहे. येणारा पर्युषण सण तसेच नवरात्री

सणाच्या हार्दिक शुभेच्छा. तसेच सर्व नगरसेवकांनी पाच वर्षाचा कालावधी यशस्वीपणे पार केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन तसेच येणाऱ्या निवडणूकीत पुन्हा विजयी व्हावे म्हणून हार्दिक शुभेच्छा.

अशरफ शेख :-

सभापती साहेब प्रकरण क्र. 137 ते 144 पर्यंत आमच्याकडे गोषवारे आले नाही.

शर्मिला बगाजी :-

मा. सभापतींच्या परवानगीने आपला स्टँडिंगचा कार्यकाल तसेच आपला नगरसेवकांचा पाच वर्षाचा कार्यकाळ संपेल. शेवटच्या मिटींगसाठी उपस्थित असलेले मा. आयुक्त आपल्याला जो काळ मिळाला त्यामध्ये आपण शहराच्या विकासासाठी बरीच काम केली. काम करत असताना आमच्या काही सुचना होत्या सत्ताधाऱ्यांच्या सुचना होत्या त्याला आम्ही दुजोरा दिला हे सर्व काम करत असताना आपले मतभेद होतात पण आपण सर्व मतभेद बाजूला ठेऊन शहराच्या विकासासाठी कार्य केलेले आहे. सभापती म्हणून उत्तम कार्यकाळ आपण सांभाळलेला आहे. त्याबद्दल अभिनंदन पुढच्या निवडणूकीत आपण निवडून यावे म्हणून आपल्याला शुभेच्छा.

अशरफ शेख :-

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसतर्फे मा. सभापती, मा. आयुक्त तसेच इथे बसलेले सर्व सदस्य ह्यांचे मी मनापासून आभार मानतो.

मर्लिन डिसा :-

आमच्या पक्षातर्फे आभार मानते. तुम्ही आम्हाला नेहमी बोलण्याची संधी दिली. तुम्ही नेहमी कोऑपरेट केले आमची अशी अपेक्षा आहे की तुम्ही आमदार खासदार बनावे. धन्यवाद.

सुरेश खंडेलवाल :-

मा. सभापती, मा. आयुक्त आपले स्थायीचे सर्व सदस्य तसेच प्रशासनाने अधिकारी आज आपल्या नगरसेवक पदाचा कार्यकाल आज संपत आहे. आपण ह्या कार्यकाळात शहराच्या हितासाठी बरेच निर्णय घेतले. त्यांचे इम्पलीमेंटेशन केले आणि चांगले काम केले म्हणून सर्वांचे अभिनंदन करतो. ह्या टर्ममध्ये जो बजेट मंजूर केला त्या बजेटवर आपण तीन दिवस सतत चर्चा केली होती. त्यामध्ये प्रशासनाला घेऊन काही बदल केले होते परंतु तो बजेट पुन्हा विखंडनाला गेला विकासाची काम आम्ही करु शकलो नाही म्हणून पूढे अशी विनंती आहे भविष्यात प्रशासन आणि शासन दोन्ही मिळून ह्याच्यावर निर्णय घेता मिळूनचे काम करायचे असते पूढे अशाप्रकारे काम केले शहराच्या विकासाच्या दृष्टीने चांगले काम करु शकतो मा. सभापती आणि आयुक्तांना अभिनंदन आणि धन्यवाद.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २६/०८/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०९ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. 136, दि. 17/05/2022, दि. 20/05/2022 (दि. 17/05/2022 रोजीची तहकुब सभा), दि. 14/06/2022, दि. 17/06/2022, दि. 28/06/2022, दि. 19/07/2022 व दि. 02/08/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

शानू गोहिल :-

दि. 17/05/2022, दि. 20/05/2022 (दि. 17/05/2022 रोजीची तहकुब सभा), दि. 14/06/2022, दि. 17/06/2022, दि. 28/06/2022, दि. 19/07/2022 व दि. 02/08/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

सुनिता जैन :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 136 :-

दि. 17/05/2022, दि. 20/05/2022 (दि. 17/05/2022 रोजीची तहकुब सभा), दि. 14/06/2022, दि. 17/06/2022, दि. 28/06/2022, दि. 19/07/2022 व दि. 02/08/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. 114 :-

दि. 17/05/2022, दि. 20/05/2022 (दि. 17/05/2022 रोजीची तहकुब सभा), दि. 14/06/2022, दि. 17/06/2022, दि. 28/06/2022, दि. 19/07/2022 व दि. 02/08/2022 रोजींच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- श्रीम. सुनिता जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 137, पशुसंवर्धन विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत पशुवैद्यकीय अधिकारी यांना वेतनवाढ देणेबाबत.

आनंद मांजरेकर :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसर डॉ. विक्रम मधुकर निराटले यांना महापालिका कार्यालयीन कामकाजाकरीता श्वान निर्बिजीकरण केंद्र-भाईंदर, पशुसंवर्धन विभाग ठाणे, मुलूंड, भिवंडी तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जखमी जनावरांवर प्रथमोपचार करण्यासाठी स्वखर्चाने जावे लागत असुन त्याकरीता कुठलाही वाहन/इंधन भत्ता देण्यात येत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर सुधारित आकृतीबंधानुसार पशुवैद्यकिय विभागासाठी पशूवैद्यकिय अधिकारी हे 01 पद सातव्या वेतन आयोगानुसार S-20 - 56100-177500 या वेतनश्रेणीत मंजूर आहे. सदर पदावर सरळसेवेने नियुक्ती केल्यास प्रती महा रू. 96,021/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याप्रमाणे डॉ. विक्रम मधुकर निराटले यांना मिळत असलेले मासिक वेतन रू. 30,000/- हे तत्पुंज्य असल्याने त्यांच्या मासिक वेतनात रू. 20,000/- ची वाढ करून प्रति माह रू. 50,000/- इतके वेतन अदा करणेस ही सभा मजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

जयेश भोईर :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 137 :-

पशुसंवर्धन विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत पशुवैद्यकीय अधिकारी यांना वेतनवाढ देणेबाबत.

ठराव क्र. 115 :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसर डॉ. विक्रम मधुकर निराटले यांना महापालिका कार्यालयीन कामकाजाकरीता श्वान निर्बिजीकरण केंद्र-भाईंदर, पशुसंवर्धन विभाग ठाणे, मुलूंड, भिवंडी तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जखमी जनावरांवर प्रथमोपचार करण्यासाठी स्वखर्चाने जावे लागत असुन त्याकरीता कुठलाही वाहन/इंधन भत्ता देण्यात येत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर सुधारित आकृतीबंधानुसार पशुवैद्यकिय विभागासाठी पशूवैद्यकिय अधिकारी हे 01 पद सातव्या वेतन आयोगानुसार S-20 - 56100-177500 या वेतनश्रेणीत मंजूर आहे. सदर पदावर सरळसेवेने नियुक्ती केल्यास प्रती महा रू. 96,021/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याप्रमाणे डॉ. विक्रम मधुकर निराटले यांना मिळत असलेले मासिक वेतन रू. 30,000/- हे तत्पुंज्य असल्याने त्यांच्या मासिक वेतनात रू. 20,000/- ची वाढ करून प्रति माह रू. 50,000/- इतके वेतन अदा करणेस ही सभा मजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. आनंद मांजरेकर अनुमोदक :- श्री. जयेश भोईर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 138, सन 2021 मध्ये करोना काळामध्ये मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीने पोलीस प्रशासनास पुरवठा केलेल्या बसेसचे देयक अदा करणेबाबत.

शानु गोहिल :-

कोविड-19 नियंत्रणाच्या दृष्टीने सहा. पोलिस आयुक्त कार्यालय अंतर्गत पोलिस स्टेशन करीता प्रशासनाच्या आदेशानुसार दि. 23-04-2021 ते दि. 04-06-2021 या कालावधीत प्रति दिन 3 बसेस मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांचेकडून उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सदर बस पुरवठासाठी रू. 5300/- प्रति दिन प्रति बस प्रमाणे होणारे देयक रककम रू. 12,57,250/- मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांना अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुनिता जैन :-

माझे अनुमोदन आहे.

अशरफ शेख :-

ह्या विषयाचा गोषवारा आलेला नाही.

हसमुख गेहलोत :-

इनको मनपा की तरफ से कहाँ गया था की आप सुविधा उपलब्ध कर दो| आपण त्यांना पत्र दिले होते का?

मा. आयुक्त :-

पत्र दिले होते.

अशरफ शेख :-

मेरे कहने का मतलब आपने गोषवारा क्यों नही दिया तो अभ्यास करने को वक्त नही मिला इसके लिए मेरा विरोध है|

हसमुख गेहलोत :-

आप अपना विरोध दर्शा सकते है|

शर्मिला बगाजी :-

गोषवारा नही दिया क्योंकी प्रशासन की तरफ से विषय नही आया यह विषय सभापती के अधिकार से लिया है| प्रशासन से खुलासा ले लो|

सुरेश खंडेलवाल :-

मा. सभापती महोदय पूढचे 3-4 विषय आहेत तर सगळ्यांचा एकदाच खुलासा होऊ द्या.

स्वप्नील सावंत :-

मा. सभापतींच्या परवानगीने कोविड कालावधीत तीन बसेस आपण पोलिसांना उपलब्ध करुन देण्यासाठी आदेशित केले होते त्याअनुषंगाने 3 बसेस उपलब्ध करुन दिल्या त्यासाठी त्यांनी 19 लाख रुपयांची मागणी केली होती परंतु 12 लाख 45 हजार खर्च त्यांनी अपेक्षित केला होता. पैसे जास्त होते म्हणून आपण दिले नाही.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 138 :-

सन 2021 मध्ये करोना काळामध्ये मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीने पोलीस प्रशासनास पुरवठा केलेल्या बसेसचे देयक अदा करणेबाबत.

ठराव क्र. 116 :-

कोविड-19 नियंत्रणाच्या दृष्टीने सहा. पोलिस आयुक्त कार्यालय अंतर्गत पोलिस स्टेशन करीता प्रशासनाच्या आदेशानुसार दि. 23-04-2021 ते दि. 04-06-2021 या कालावधीत प्रति दिन 3 बसेस मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांचेकडून उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सदर बस पुरवठासाठी रू. 5300/- प्रति दिन प्रति बस प्रमाणे होणारे देयक रककम रू. 12,57,250/- मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांना अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- श्रीम. सुनिता जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 139, करोना काळामध्ये न चालवलेल्या बसेसच्या इन्श्युरन्स प्रिमीयमच्या रक्कमेची परिगणना करुन मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीस रक्कम अदा करणेबाबत.

मनोज दुबे :-

कोविड-19 नियंत्रणाच्या दृष्टीने शासनाने लागु केलेल्या निर्बंधाच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या उपलब्ध ताफयापेक्षा कमी बसेस चालविण्याबाबत मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनी यांना निर्देश दिले होते. तथापि सदर कालावधीतील सर्व बसेसची

विमा रक्कम मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीकडून महानगरपालिकेने वसुल केलेली आहे. मात्र कोविड-19 नियंत्रणासाठी शासनाने लागु केलेल्या निर्बंधामुळे महानगरपालिकेच्या निर्देशानुसार न चालवलेल्या बसेसच्या इनश्युरन्स प्रिमियमच्या रकमेची परिगणना करून मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीस रक्कम परतावा करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 139 :-

करोना काळामध्ये न चालवलेल्या बसेसच्या इन्श्युरन्स प्रिमीयमच्या रक्कमेची परिगणना करुन मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीस रक्कम अदा करणेबाबत.

ठराव क्र. 117 :-

कोविड-19 नियंत्रणाच्या दृष्टीने शासनाने लागु केलेल्या निर्बंधाच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या उपलब्ध ताफयापेक्षा कमी बसेस चालविण्याबाबत मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनी यांना निर्देश दिले होते. तथापि सदर कालावधीतील सर्व बसेसची विमा रक्कम मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीकडून महानगरपालिकेने वसुल केलेली आहे. मात्र कोविड-19 नियंत्रणासाठी शासनाने लागु केलेल्या निर्बंधामुळे महानगरपालिकेच्या निर्देशानुसार न चालवलेल्या बसेसच्या इनश्युरन्स प्रिमियमच्या रकमेची परिगणना करून मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीस रक्कम परतावा करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. मनोज दुबे        अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 140, मे. भागीरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी दि. 01/08/2019 ते 17/12/2020 या कालावधीत Ded/Extra किलोमीटरचे देयक अदा करणेबाबत.

शानु गोहिल :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाद्वारे मे. भागीरथी एम.बी.एम.टी. या कंपनीद्वारे परिवहन बसेस चालविण्याचा ठेका देण्यात आला होता. सदर कंपनीद्वारे दि. 01-08-2019 ते दि. 17-12-2020 या कालावधीत Ded / Extra किलोमिटरचे देयक अदा करणेबाबत प्रशासनाने अभिप्रायासह प्रस्ताव सादर करुन निर्णय घेणेकरीता मा. महासभेत प्रस्ताव सादर करावा असा ठराव मांडत आहे.

सुनिता जैन :-

माझे अनुमोदन आहे.

जयंतीलाल पाटील :-

मा. सभापती महोदय सर्व विषय पास केले तर हा पण पास करा कशाला ठेवता.

हसमुख गेहलोत :-

त्याचा विषय पास केला असता पण ते आता जागेवर नाहीत. त्यांनी महापालिकेचे नुकसान केले आहे त्याची शहानिशा करुन प्रस्ताव सादर करायला लागेल.

सुरेश खंडेलवाल :-

कंपनी वेगळी आहे.

शर्मिला बगाजी :-

विषय आणायला नव्हता पाहिजे.

हसमुख गेहलोत :-

त्याचे काय बाकी असेल तर त्याला खंत नको म्हणून प्रशासनाने सादर करुन शहानिशा करावी.

जयंतीलाल पाटील :-

मा. आयुक्त साहेब शहानिशा करुन योग्य निर्णय घ्यावा.

प्रकरण क्र. 140 :-

मे. भागीरथी एमबीएमटी प्रा.लि. यांनी दि. 01/08/2019 ते 17/12/2020 या कालावधीत Ded/Extra किलोमीटरचे देयक अदा करणेबाबत.

ठराव क्र. 118 :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाद्वारे मे. भागीरथी एम.बी.एम.टी. या कंपनीद्वारे परिवहन बसेस चालविण्याचा ठेका देण्यात आला होता. सदर कंपनीद्वारे दि. 01-08-2019 ते दि. 17-12-2020 या कालावधीत Ded / Extra किलोमिटरचे देयक अदा करणेबाबत प्रशासनाने अभिप्रायासह प्रस्ताव सादर करुन निर्णय घेणेकरीता मा. महासभेत प्रस्ताव सादर करावा असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल    अनुमोदक :- श्रीम. सुनिता जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 141, मे. भागीरथी एमबीएमटी प्रा.लि. यांची बँक गॅरंटी रक्कम परतावा करणेबाबत.

शानु गोहिल :-

मे. भागीरथी एम.बी.एम.टी. प्रा.लि. यांची बँक गॅरंटी रक्कम परतावा करणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने योग्य तो निर्णय घेवून अभिप्रायासह प्रस्ताव सादर करुन निर्णय घेणेकरीता मा. महासभेत प्रस्ताव सादर करावा असा ठराव मांडत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 141 :-

मे. भागीरथी एमबीएमटी प्रा.लि. यांची बँक गॅरंटी रक्कम परतावा करणेबाबत.

ठराव क्र. 119 :-

मे. भागीरथी एम.बी.एम.टी. प्रा.लि. यांची बँक गॅरंटी रक्कम परतावा करणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने योग्य तो निर्णय घेवून अभिप्रायासह प्रस्ताव सादर करुन निर्णय घेणेकरीता मा. महासभेत प्रस्ताव सादर करावा असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 142, मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 64, दि. 18/08/2019 विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

आनंद मांजरेकर :-

प्रकरण क्र. 142 च्या ठरावाचे वाचन केले.

मनोज दुबे :-

माझे अनुमोदन आहे.

मर्लिन डिसा :-

यह ठराव हमारे टर्म का नही है|

शर्मिला बगाजी :-

हा विषय अगोदरच्या स्टँन्डिंगला झाला आहे आणि न्यायालयीन प्रक्रिया असल्यामुळे परत आपल्याकडे होणे योग्य नाही ह्या विषयासंदर्भात आमची भुमिका वेगळी असेल आपण खुलासा करावा. हा विषय प्रशासनाकडे असल्यामुळे त्याच्यावर निर्णय घेणे योग्य नाही. आपण बांधील रहावे असे मला वाटत नाही कारण त्याच्यामुळे आपल्या सदस्यांना अडचण येऊ शकते.

हसमुख गेहलोत :-

इसमें सुचना अॅड करके लो की इसपे शहानिशा करके आयुक्त साहब डिसीजन ले क्योंकी सदस्य के उपर भार न आए|

सुरेश खंडेलवाल :-

2019 मध्ये जो विषय झाला आहे त्याच्यावर काय विचार विनिमय करणार? मा. आयुक्त आणि प्रशासन बघेल आपल्याला काय करायचे आहे.

हसमुख गेहलोत :-

बहुत सारी चीजो की सदस्य महोदय को जानकारी नही है महापालिका का नुकसान न हो, महापालिका का एक्स्ट्रा पैसा न जाए| शहानिशा करके आयुक्त् महोदय इसपे निर्णय ले|

शर्मिला बगाजी :-

तो जो विषय आहे त्याच्यात ठराव मांडला आहे. आम्हाला ह्या गोष्टीचा असा विरोध आहे की सदर विषय स्टॅन्डिंग सभेत पास झाला आहे तो आमच्याकडे न येता जो निर्णय प्रशासनाने घ्यावा.

हसमुख गेहलोत :-

सदस्य महोदय माझे म्हणणे तेच आहे. ठरावामध्ये सुचनेसहीत नमुद करतो की प्रशासनाने ह्याच्यावर शहानिशा करुन जे योग्य आहे ती कारवाई करावी.

शर्मिला बगाजी :-

एका ठिकाणी ठरावामध्ये क्लियरली लिहिले आहे नंतर तुम्ही खाली लिहता प्रशासनाने शहानिशा करावी. तर सभापती तुम्ही रुलिंग द्या की ठरावामध्ये पूर्ण बदल करुन घ्या. सदर विषय प्रशासनाकडे प्रलंबित असल्यामुळे आपण ती विषय घ्यायलाच नव्हता पाहिजे.

सुरेश खंडेलवाल :-

प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

मा. सभापती :-

इस विषय हम ठराव न करते हुए प्रशासन इसपे निर्णय ले सकती है|

(सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात आला.)

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 143, निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

सिमा शाह :-

| अ.क्र. | मालमत्तेचे नाव | अर्जदाराचे नाव / संस्थेचे नाव |
|---|---|---|
| 1. | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 189 मधील स्मशानभूमि | मे. जनकल्याण सामाजिक व सांस्कृतिक संस्था |
| 2. | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 190 मधील ब्युरीयल ग्राउंड | सेंट जोसेफ चर्च / मिरा-भाईंदर ख्रिश्वन वेल्फेअर असोसिएशन |

आरक्षण क्र. 189 (स्मशानभूमि) व आरक्षण क्र. 190 (ब्युरीयल ग्राउंड) च्या दैनंदिन संचलन, देखभाल व दुरूस्तीकरीता मागणी केलेल्या वरील संस्थाना महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोराणानुसार तीन वर्षे मुदतीकरीता मालमत्ता करारनामा करून देण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुजाता पारधी :-

माझे अनुमोदन आहे.

मर्लिन डिसा :-

मा. सभापती साहेब मेरा एक रिक्वेस्ट था वो जो ख्रिश्चन दफनभुमी जो 2020 में डेव्हलप किया था ख्रिश्चन दफनभूमी के 75 चर्चेस के लोगो को फ्यूनरल होता है|

अशरफ शेख :-

कितने लोगो ने अप्लाय किया है उसका खुलासा करो|

मर्लिन डिसा :-

कितने लोगो ने अप्लाय किया वो बताओ थोडासा टाईम दे दो|

दिपक खांबित :-

आपण रिकॉल केले 1-1 संस्था आली.

मर्लिन डिसा :-

त्यांना माहिती दिली नसेल.

मा. आयुक्त :-

अत्यावश्यक सेवा आहे किती वेळा रिकॉल करणार.

दिपक खांबित :-

आपण पेपरला जाहिरात दिली होती.

मर्लिन डिसा :-

तुमची जाहिरात पोहोचली नसेल.

मा. आयुक्त :-

जाहिरात पोहोचणार नसेल तर कितीही वेळा काढली तरी पोहोचणारच नाही. ही अत्यावश्यक सेवा आहे. कितीही वेळा जाहिरात काढून वेटींग पिरेडमध्ये बघू नये. ही अत्यावश्यक सेवा आहे डे नाईट फॅसिलटी ठेवावी लागते.

मर्लिन डिसा :-

दोन दिवस द्या.

मा. आयुक्त :-

2-2 वेळा जाहिरात काढलेली आहे.

मर्लिन डिसा :-

साहेब मला पण माहित नव्हते, माझी रिक्वेस्ट आहे. दोन दिवस द्या.

मा. आयुक्त :-

जाहिरात पाहिली नाही म्हणून परत द्या असे होत नाही.

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम दुसरी संस्था आली की त्याला टेंडर प्रोसेस असे सर्व असते म्हणून कोणतीही प्रोसेस थांबत नसते.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 143 :-

निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

ठराव क्र. 120 :-

| अ.क्र. | मालमत्तेचे नाव | अर्जदाराचे नाव / संस्थेचे नाव |
|---|---|---|
| 1. | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 189 मधील स्मशानभूमि | मे. जनकल्याण सामाजिक व सांस्कृतिक संस्था |
| 2. | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 190 मधील ब्युरीयल ग्राउंड | सेंट जोसेफ चर्च / मिरा-भाईंदर ख्रिश्चन वेल्फेअर असोसिएशन |

आरक्षण क्र. 189 (स्मशानभूमि) व आरक्षण क्र. 190 (ब्युरीयल ग्राउंड) च्या दैनंदिन संचलन, देखभाल व दुरूस्तीकरीता मागणी केलेल्या वरील संस्थाना महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोराणानुसार तीन वर्षे मुदतीकरीता मालमत्ता करारनामा करून देण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. सिमा शाह अनुमोदक :- श्रीम. सुजाता पारधी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 144, निवीदेला मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) सदर विषयाचा गोषवारा नसल्याकारणाने तो विषय आपण वगळतो. प्रकरण क्र. 145, मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

प्रकरण क्र. 145 :-

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

ठराव क्र. 121 :-

**आरोग्य् विभाग**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2022 होणार आहे. या सर्वेक्षणात स्वच्छ सर्वेक्षण 2022 अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात ODF ++ /Water Plus, Garbage Free City, महानगरपालिकेतर्फे देत असलेल्या विविध सेवांबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करणे तथा स्वचछ सर्वेक्षण 2022 खालीलप्रमाणे विविध कमाच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | ठेकेदाराचे नाव | कामाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका स्वच्छ भारत मिशन (नागरी) स्वच्छ सर्वेक्षण 2022 करिता तांत्रिक सल्लागाराचे नियुक्ती (दि. 27/01/2022 ते दि. 26/07/2022 ) | M/s. B Kumar INFRA Advisory Pvt. Ltd. | Rs. 14,85,000/- |
| 2. | शहरातील प्रभाग हद्दी, गटारे नाले, तलाव, विहिरी यांचे Geo Mapping (GIS Mapping) करणे | मे. ऑर्नेट टेकनॉलाजीस प्रा. लि. | Rs. 8,80,280/- |
| 3. | स्वच्छ सर्वेक्षण 2021 करीता IEC Activity व्दारे जनजागृती करणे करणेबाबत | मे.ऑर्नेट टेकनॉलाजीस प्रा. लि. | Rs. 12,30,000/- |
| 4. | | मे. फुलराणी अ‍ॅडव्हरटायझींग अ‍ॅन्ड मार्केटींग | Rs. 6,99,800/- |
| 5. | 60 लिटर क्षमतेचे HDPE Twin bin GI stand सह सिमेंट फाऊंडेशनमध्ये बसविणे. | मे. एन. डी. सप्लायर्स | Rs. 9,61,875/- |
| 6. | स्वच्छ सर्वेक्षण 2023 Project Implementation Unit करीता तांत्रिक सल्लागार नियुक्तीबाबत | M/s. B Kumar INFRA Advisory Pvt. Ltd. | Rs. 24,60.000/- (10 महिने) |

सार्व. आरोग्य विभागामार्फत स्वच्छ सर्वेक्षण 2022 करीता अ.क्र. 01 ते 05 करीता वरील नमुद केलेली कामे पुर्ण करून घेण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण 2023 Project Implementation Unit करीता अ.क्र. 06 कामास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

सदरच्या विषयाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 73(ड) अन्वये मा. स्थायी समितीमध्ये अवलोकन करण्यात आले.

**घनकचरा विभाग**

उपरोक्त विषयांन्वये महानगरपालिका घनकचरा प्रक्रिया विभागात विविध निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नाव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी आगीवर नियंत्रण मिळवणेसाठी व्यवस्था करणेकामी सिंटेक्स टाकीचा पुरवठा करणे | रू.5,46,000/- | मे. राठोड असोसिएट्स | अंदाजपत्रक दराने |
| 2 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकच-यावर प्रक्रिया करुन निघणाऱ्या इर्नटची Sanitary Landfill करुन विल्हेवाट लावणे कामी तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करणे. | रू.9,95,000/- | मे. जयंत घिके | अंदाजपत्रक दराने |
| 3 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी जमा असलेल्या जुन्या कच-यावर फवारणी करणेकामी Enzyme Conglomerate Powder खरेदी करणे | रु.9,90,000/- | मे. चैतन्य सॉईल सायन्स प्रा. लि. | अंदाजपत्रक दराने |
| 4 | मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर (प.) उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी लिचेटवर प्रक्रिया करणेकामी मोटर पंप बसविणे. | रु.9,66,970/- | मे. राठोड असोसिएट्स | अंदाजपत्रक दराने |
| 5 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) उत्तन येथील ठिकाणी Sanitary Landfill तयार करणे कामी खोदकाम करणे | रु. 7,98,330/- | मे. राठोड असोसिएट्स | अंदाजपत्रक दराने |

वरील कामे महाराष्ट महानगरपालिका अधिनियम कलम 73(ड) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 146, मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (महिला व बालकल्याण विभाग) -- महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत Ms-Cit प्रशिक्षण बाबत.

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

प्रकरण क्र. 146 :-

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (महिला व बालकल्याण विभाग) -- महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत Ms-Cit प्रशिक्षण बाबत.

ठराव क्र. 122 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत गरीब व गरजू मुली/महिलांना Ms-Cit प्रशिक्षण देणेकरीता मा. आयुक्त यांची मंजूरी घेवून ई-टेंडरींगद्वारे जाहिर निविदा सुचना वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा मागविण्यात आली होती. त्याकरीता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या कमी दरांच्या निविदेस मा. आयुक्त यांनी दि. 14/06/2022 रोजी

मान्यता दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत गरीब व गरजू मुली/महिलांना Ms-Cit प्रशिक्षणाकरीता रु. 25,00,000/- रक्कमेच्या मर्यादेत खर्च होणार आहे.

सदरच्या विषयाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 73(ड) अन्वये मा. स्थायी समितीमध्ये अवलोकन करण्यात आले.

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 147, मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे (ऑफलाईन) अवलोकन करणे. (महिला व बालकल्याण विभाग) -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता 10वी पास झालेल्या गरीब व गरजू मुला/मुलींना तसेच अपंग व्यक्तीच्या मुलांचा गुणगौरव करुन साहित्य वाटप करणे.

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

सुरेश खंडेलवाल :-

आज शेवटची सभा आहे आणि सोमवारपासून प्रशासक म्हणून शहराचा कार्यभार आपण सांभाळणार. ट्राफीक पोलिसचे मी मध्ये बोललो होतो की ट्राफीक पोलिसचे टोईंगचे जे कलेक्शन आहे आणि शहरामध्ये जिथे पी 1, पी 2 चे बोर्ड लागले नाहीत जिथे नो पार्किंगचे बोर्ड आहेत तिथे पण टोईंगचे काम झपाट्याने चालू आहे. कलेक्शन मिरा भाईंदर महापालिकेला यायला पाहिजे तो आला की नाही.

मा. आयुक्त :-

मागच्या 4-5 दिवसांपूर्वी संबंधीत कर्मचारी बोलवले होते त्याच्यात 50 टक्के रेव्हेन्यू महापालिकेला आला पाहिजे आणि राहिलेला 50 टक्के त्याचा. पावती पुस्तके देताना मागचा रेव्हेन्यू आपण भरुन घेतलेला आहे आणि नविन पावती पुस्तक दिलेले आहे आणि सांगितले आहे 15 दिवसातून आम्हाला अपडेट द्यायचे कसल्याही परिस्थितीत जप्त केलेले वाहन विदाऊट रिसीप्ट सोडायचे नाही अशा सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सुरेश खंडेलवाल :-

पॅचवर्कसाठी 5 कोटीचे टेंडर केले होते. आपण पॅचवर्कसाठी जी नविन टेक्नॉलॉजी वापरली होती ती यशस्वी झाली नाही त्याच्याबद्दल योग्य तो निर्णय घ्यावा.

मा. आयुक्त :-

मुंबई महापालिकेनी ॲडव्हान्स टेक्नोलॉजी आणली. काँक्रीट ओतल्यानंतर 6 तास पाणी नाही पडले तर 6-7 तासाने तो रोड वाहतुकीसाठी खुला करु शकतो. नविन जे रेडीमिक्स आले आहे आपल्याकडे जे कॉन्ट्रॅक्टर काम करतात त्यांना ते मटेरियल वापरायला लावून गणपती पूर्वी खडी मुक्त मिरा भाईंदर असले पाहिजे ह्यासाठी प्रशासन डेनाईट काम करते.

शर्मिला बगाजी :-

आमचा आज नगरसेवक पदाचा शेवटचा दिवस आहे नंतर आपल्याकडे प्रशासकीय अधिकार राहणार आहेत. इलेक्शन होईपर्यंत मधल्या कार्यकाळात आम्ही सामान्य नागरिक म्हणून आम्ही येऊ.

आतापर्यंत अशा सम्या घेऊन आलो पूढेही येऊ त्या काळामध्ये देखील आपल्याकडून असेच सहकार्य मिळेल अशी अपेक्षा.

मा. आयुक्त :-

आज स्टॅन्डिंगची शेवटची सभा आहे. 28.8 रोजी आपल्या बॉडीचा कार्यकाळ पूर्ण होत आहे. त्यानंतर प्रशासकीय राजवट चालू होते जेवढे दिवस प्रशासकीय राजवट असेल तेवढे दिवस आपले कामकाज पूर्वी जसे चालत होते तसेच चालत राहिल. आपण सगळ्यांनी माझ्या आयुक्त पदाच्या कार्यकाळात चांगले सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचे आभार व्यक्त करतो. त्याचप्रमाणे इथून पूढची निवडणूक होईपर्यंत आपण एकत्र शहर सांभाळले तसेच सांभाळले जाईल. निवडणूका होईपर्यंत स्थानिकांसाठी तुम्हीच नगरसेवक असणार. वेळोवेळी प्रशासनाला मदत लागली तर तुमची मदत घेण्यात येईल पुढच्या वाटचालीस शुभेच्छा तुम्ही पुन्हा निवडून याल अशी अपेक्षा करतो. पुन्हा ह्या सभागृहात आपण भेटणारच आहोत. प्रशासन शहर व्यवस्थित सांभाळेल पुढे आपल्याला यश लाभो अशी शुभेच्छा. धन्यवाद.

प्रकरण क्र. 147 :-

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे (ऑफलाईन) अवलोकन करणे. (महिला व बालकल्याण विभाग) -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता 10वी पास झालेल्या गरीब व गरजू मुला/मुलींना तसेच अपंग व्यक्तीच्या मुलांचा गुणगौरव करुन साहित्य वाटप करणे.

ठराव क्र. 123 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता 10वी पास झालेल्या गरीब व गरजू मुलींना तसेच अपंग व्यक्तीच्या मुलांचा गुणगौरव करुन साहित्य वाटप करणेकामी मा. आयुक्त यांची मंजूरी घेवून ई-टेंडरींगद्वारे जाहिर निविदा सुचना वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा मागविण्यात आली होती. त्याकरीता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या कमी दरांच्या निविदेस मा. आयुक्त यांनी दि. 03/01/2022 रोजी मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता 10वी पास झालेल्या गरीब व गरजू मुलींना तसेच अपंग व्यक्तीच्या मुलांचा गुणगौरव करुन साहित्य वाटप करणेकामी रु. 10,00,000/- रक्कमेच्या मर्यादेत खर्च झालेला आहे.

सदरच्या विषयाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 73(ड) अन्वये मा. स्थायी समितीमध्ये अवलोकन करण्यात आले.

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-

सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- 11.05 वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका